**प्रेसनोट** **दिनांक २५/०४/२०१९**

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

### तडीपार गुंड सुशांत उर्फ मटया शशिकांत कुचेकर यास तडीपार आदेशाचे उल्लंघन केले म्हणून १ वर्षे साध्या कैदेची शिक्षा.

दि. ११/०२/२०१७ रोजी बारणे रोड, मंगळवार पेठ येथे तडीपार इसम नामे सुशांत उर्फ मटया शशिकांत कुचेकर रा. नानापेठ, पुणे हा तडीपार आदेशाचे उल्ल्ंघन करुन आपले इतर ४ साथीदारांसोबत लडकत पेट्रोल पंप मंगळवार पेठ, पुणे येथे दरोडा घालण्याच्या तयारीत असताना मिळुन आले होते. त्यांचेविरुद्ध समर्थ पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार दत्तात्रय येळे यांनी सरकारतर्फे दिलेल्या तक्रारीनुसार ग.र.न.३७/१७ भादवि कलम ३९९,४०२ व महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम १४२ प्रमाणे गुन्हा नोंद केला होता. सदर गुन्हयाचा तपास हा पोलीस उपनिरीक्षक नितीन अतकरे यांनी करुन दि. १०/०४/२०१७ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले होते.

सदर गुन्हयाचा खटला जिल्हा न्यायालयात सेशन केस नं. ३८९/१७ प्रमाणे सुरु होता. खटल्याच्या सुनावणी अंती दि. २५/०२/२०१९ रोजी सदर गुन्हयाचा निकाल मा. अतिरीक्त सत्र न्यायाधिश यांनी दिला असुन आरोपी नं. १ यास तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी १ वर्षे साधी कैद व रुपये २०००/- दंड आणि तो न दिल्यास ०२ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली असुन दरोडा तयारीच्या केसमधुन त्यांना मुक्त केले आहे.